# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे 01

web: www.dhepune.gov.in Mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.020/26126939, 29707098 फॅक्स 020/26111153

क्र.उशिसं/शिष्य-2024-25/डीबीटी/ दि.

**महत्वाचे परिपत्रक**

**विषय : दिनांक 30 सप्टेंबर 2024 ते दिनांक 07 ऑक्टोंबर 2024 या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष सप्ताह राबविणेबाबत.**

राज्यशासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी महाडीबीटी पोर्टलद्वारे करण्यात येत आहे. सन 2024-25 करीता महाडीबीटी पोर्टलवरुन उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून दि.25.07.2024 पासून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या खालील 14 शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

| अ.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| 1 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| 2 | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| 3 | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| 4 | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| 5 | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |
| 6 | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| 7 | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| 8 | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| 9 | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| 10 | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| 11 | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| 12 | राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती(भाग-2) |
| 13 | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| 14 | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

सदरहू शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती https://mahadbt.maharashtra.gov.in तसेच https://dhepune.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

संचालनालयाचे दि.05.08.2024.रोजीच्या परिपत्रकान्वये, विद्यार्थ्यांनी उपरोक्त नमुद संकेत स्थळांवर अर्ज कसा भरावा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. तसेच फी मंजूरीबाबत सविस्तर माहिती महाविद्यालयांना देण्यात आलेली आहे.

आता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरणेकरीता दि. 30.09.2024 ते दि. 07.10.2024 या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष सप्ताह राबविण्यात यावा.याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**विद्यार्थ्यांनी करावयाची पूर्वतयारी-**

1. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योनजनेचे अर्ज भरताना साधारणत: उत्पन्न प्रमाणपत्र, महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र, जातीचा दाखला इत्यादी कागदपत्रे आवश्यक असतात.
2. शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकाचा वापर करुन अर्ज भरता येतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे .
3. शिष्यवृत्तीचे शासन निर्णय अटी-शर्ती देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.
4. विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरतांना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे अचूक भरुन ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयांकडे पुढील कार्यवाही करीता सादर करावी.
5. ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचणी निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घेण्यात यावेत.

**महाविद्यालयांनी करावयाची पूर्वतयारी-**

1. शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेसाठी महाविद्यालयांनी संगणक, प्रिंटर,इंटरनेट इत्यादी सेवा नि:शूल्क उपलब्ध करुन द्यावे.
2. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे (उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला इ.) त्वरीत प्राप्त होणेसाठी तहसिलदार/उपविभागीय कार्यालयांमार्फत महाविद्यालयात शिबिर आयोजित करण्यात यावेत.
3. महाविद्यालयांनी शिष्यवृत्तीनिहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी पोर्टलवर अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली ( अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार (अनुदानित/ विनाअनुदानित) अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती (Admission Details) टक्केवारी, शिष्यवृत्ती लाभ इ. काळजीपूर्वक पडताळणी करणे आवश्यक आहे.)
4. महाविद्यालयाच्या लिपिकांनी त्यांचे लॉगीनवर आलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही ( Approve / Reject / Sent Back) करावी. महाविद्यालयाच्या लिपिकांनी मंजूर ( Approve) केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनवर पाठवावे.
5. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपिकांप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची पडताळणी करुन सदर अर्जावर तातडीने ( Approved / Reject / send Back) कार्यवाही करावी.
6. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होताच शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घेऊन पात्र अर्ज तसेच महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज संबधीत विभागाकडे दि.10.10.2024.पर्यंत सादर करावीत.
7. महाविद्यालय स्तरावर दि. 30.09.2024 ते दि. 07.10.2024 **"विशेष सप्ताह"** म्हणून साजरा करण्यात यावा. सदर सप्ताहामध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे समाधान महाविद्यालयातील शिष्यवृत्ती नोडल अधिकारी यांनी तात्काळ करावे.
   तसेच संबधित विभागीय सहसंचालकांनी शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज, आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत अपलोड असणारे व ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम बरोबर दर्शविली आहे अशाच विद्यार्थ्यांचे अर्ज संचालनालयाच्या(DHE Login) वर मंजूरीसाठी तात्काळ पाठविण्यात यावेत.
8. दि. 30.09.2024 ते दि. 07.10.2024 या सप्ताहामध्ये विद्यार्थ्यांना, राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती देण्यात यावी व विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त अर्ज भरुन घेण्यात यावेत. कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता महाविद्यालयांनी घ्यावी.

तसेच शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी शिष्यवृत्ती योजनांबाबतची सर्वसाधारण माहिती सर्व अधिनस्त विद्यापीठ / महाविद्यालय यांना त्यांचे संकेतस्थळ / नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावेत.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 27-09-2024 17:39:09

**(डॉ शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे – 1

प्रत-1. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
2. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे- आपल्या अधिनस्त सर्व महाविद्यालये/ संस्था यांना तात्काळ कळविण्यात यावे.
3. प्राचार्य, शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालय/ संस्था.